पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - २

**सभावृत्तांत**

**दिनांक – २८/०६/२०१९** **वेळ - सकाळी ११.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **२८/०६/२०१९** रोजी सकाळी **११.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.तुषार रघुनाथ हिंगे - सभापती**
२. मा.अभिषेक गोविंद बारणे
३. मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन
४. मा.सागर बाळासाहेब गवळी
५. मा.अपर्णा निलेश डोके

या शिवाय मा.राऊत – प्र.सहा.आयुक्त मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.४) क्रीडा विभाग, सांकृतिक धोरण, संगित अकॅडमीचे कामकाजाबाबत.- मा.अभिषेक बारणे, मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) महापौर चषक ५९ वी राष्ट्रीय बॉडी बिल्डींग स्पर्धा आयोजित करणेबाबत. – मा.बाबासाहेब त्रिभुवन - मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) प्रभाग क्र.५ गवळीनगर येथील कै.सखुबाई गबाजी गवळी उद्याना शेजारील महिला जिम मैत्री-स्वयंरोजगार या संस्थेस सेवाशुल्क तत्वावर मिळणेबाबत. – मा. सागर गवळी, मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक १४/०६/२०१९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०१) सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – २ विषय क्रमांक – ०१
दिनांक – २८/०६/२०१९ विभाग - क्रीडा
सुचक – मा.सागर गवळी अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/३०३/२०१९ दि.०१/०६/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मा.महापालिका सभा ठराव क्र. ४२१ दि. १८/१/२०१४ अन्वये, क्रीडा विभागाचे क्रीडा धोरण मंजूर झाले असून सदर धोरणामध्ये भाग-१ ड शिष्यवृत्ती मधील (१) पान क्रमांक १४ म.न.पा. परिसरातील विद्यार्थी खेळाडूंसाठी शालेय क्रीडा शिष्यवृत्ती योजना शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी व संघटनेमार्फत खेळणा-या खेळाडूंना प्रोत्साहन मिळून म.न.पा. परिसरातील जास्तीत जास्त राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार होण्याच्या दृष्टीने शिष्यवृत्ती अदा केली जाते. सन २०१७ -१८ या वर्षात १४४ पात्र विद्यार्थी खेळाडूंना एकूण क्रीडा शिष्यवृत्ती र.रू ६,२२,६००/- (अक्षरी र.रू – सहा लाख बाव्वीस हजार सहाशे फक्त ) अदा करणेस व त्याकामी येणा-या खर्चास व सदरचा खर्च क्रीडा शिष्यवृत्ती बक्षिसे या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३ विषय क्रमांक – ०२
दिनांक – २८/०६/२०१९ विभाग - क्रीडा
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.बाबासाहेब त्रिभुवन
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/४१५/२०१९ दि.११/०६/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

क्रीडा धोरणात जागतिक क्रीडा स्पर्धेत सुवर्ण पदक विजेत्या खेळाडूस र.रु.२,९९,०००/- व रौप्यपदक विजेत्या खेळाडूस २,००,०००/- आर्थिक सहाय्य अदा करणेचे धोरण आहे. कु.अभिश्रृत विजयकुमार देवकर ह्याने **Special Olympics world game 2019** अबुधाबी, दुबई येथे झालेल्या स्पर्धेत सुवर्ण पदक प्राप्त केल्यामुळे त्याला र.रू २,९९,०००/-(अक्षरी र.रु.दोन लाख नव्याण्णव हजार फक्त) आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४ विषय क्रमांक – ०३
दिनांक – २८/०६/२०१९ विभाग - क्रीडा
सुचक – मा.सागर गवळी अनुमोदक – मा.बाबासाहेब त्रिभुवन
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/३९५/२०१९ दि.१०/०६/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

क्रीडा धोरणात जागतिक क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक विजेत्या खेळाडूस २,००,०००/- आर्थिक सहाय्य अदा करणेचे धोरण आहे. सदर पत्रान्वये कु.कॅमिला सुर्यनारायण पटनायक हीने **Special Olympics world game 2019**अबु धाबी, दुबई येथे झालेल्या स्पर्धेत रौप्य पदक प्राप्त केल्यामुळे तीला र.रू २,००,०००/-(अक्षरी र.रु.दोन लाख फक्त) आर्थिक सहाय्य अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ५ विषय क्रमांक – ०४

दिनांक – २८/०६/२०१९

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सागर गवळी

संदर्भ – मा.अभिषेक बारणे, मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव -

मा.क्रीडा,कला,साहित्य व सांस्कृतिक समितीच्या अंतर्गत क्रीडा विभाग, सांस्कृतिक धोरणांसबंधित बाबी, संगीत अकॅडमीचे कामकाज चालते. सदर कामकाज वेगवेगळया विभागांमार्फत करण्यात येत असल्याने याकामात समन्वय दिसून येत नाही. आणि पर्यायाने सदर विषयांबाबत काहीही कामकाज होत नाही. तरी वरील सर्व विभाग / कामकाज मा.सहाय्यक आयुक्त(क्रीडा विभाग) यांचेकडे सोपविण्यास तसेच मा.सहाय्यक आयुक्त(क्रीडा) यांचेकडील इतर विभागाचा अतिरिक्त पदभार कमी करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ६ विषय क्रमांक – ०५

दिनांक – २८/०६/२०१९

सुचक – मा.बाबासाहेब त्रिभुवन अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.बाबासाहेब त्रिभुवन , मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने इंडिअन बॉडी बिल्डींग एन्ड फिटनेस फेडरेशन,महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशन यांचे मान्यतेने व पिंपरी चिंचवड अमेच्युअर बॉडी बिल्डींग असोसिएशन यांचे सहकार्याने दिनांक २८ ते २९ जून २०१९ या काळात प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह,चिंचवड येथे महापौर चषक ५९ वी राष्ट्रीय बॉडी बिल्डींग (वरिष्ठ) स्पर्धा – २०१९-२० आयोजित करणेस व त्याकामी प्रस्तावात नमूद प्रमाणे येणा-या अंदाजे एकूण र.रु.३२,९०,२००/-(अक्षरी र.रु.बत्तीस लाख नव्वद हजार दोनशे फक्त) चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. व स्पर्धा अनुषंगाने येणारा खर्च क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेत व वेळ अपूरा असल्याने

स्पर्धा अनुषंगाने मेडल्स, ट्रॉफीज, मानचिन्हे, फ्लेक्स, बॅनर, निमंत्रण पत्रिका, प्रमाणपत्र इ. कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन खरेदी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ७ विषय क्रमांक – ०६

दिनांक – २८/०६/२०१९

सुचक – मा.सागर गवळी अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.सागर गवळी , मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.५ गवळीनगर येथील कै.सखुबाई गबाजी गवळी उद्यानाशेजारील महिला जिम मैत्री – स्वयंरोजगार या संस्थेस सेवाशुल्क या तत्वावर देणेसाठी मान्यता देणेस मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( तुषार रघुनाथ हिंगे )**
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३०१/२०१९
दिनांक : २९/०६/२०१९

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.